पोलीस अधीक्षक कार्यालय,गडचिरोली
दिनांक ०७/०१/२०१९

# वार्तापत्र

## ‘गडचिरोली पोलीसांनी केले व्यसनमुक्ती संकल्प रॅलीचे आयोजन ’

## जिल्हयातील ८ ते १० हजार तरुणांनी घेतली व्यसनापासुन दुर राहण्याची शपथ

महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनानिमीत्त गडचिरोली पोलीस दलाने दिनांक २ जानेवारी ते ८ जानेवारी या कालावधीत रेझींग डे च्या माध्यमातुन विविध जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.त्याचा भाग म्हणुन गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन/उपपोलीस स्टेशन व पोलीस मदत केंद्र स्तरावर व्यसनमुक्ती संकल्प रॅली व शपथ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गडचिरोली जिल्हयात ५५ ठिकाणी व्यसनमुक्ती रॅली काढण्यात आली.

या रॅली दरम्यान व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम तसेच सामाजिक व आर्थिक परिणामाची जाणिव उपस्थितांना करुन देवुन जागृती करण्यात आली. सदर रॅलीस गावक-यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहुन काही ठिकाणी खर्रा विक्रेत्यांनी देखील आपली दुकाने बंद करण्याचा निर्णय घेवून या रॅलीत सहभागी झाले. रॅली संपल्यानंतर गावातील मुख्य ठिकाणी येवून सहभागी झालेल्या ८ ते १० हजार तरुणांनी व्यसनापासुन दुर राहण्याची शपथ घेतली. तसेच या दरम्यान गुटखा, तंबाखु, खर्रा अशा तंबाखुजन्य पदार्थाची होळी करुन जाळण्यात आले.




विचार करा पक्का,
तंबाखूला मारा धक्का.
रोटी, कपडा और मकान
जीवन के सब अरमान,
खर्रा-तंबाखू-गुटखा
धुम्रपान मौत के समान


पोलीस स्टेशन भामरागड
व्यसनमुक्ती रॅली
सायबर दिंडी
No Parking
Vivo V9
Dual Rear Camera
2019.01.07 13:02